## संक्षिप्त

### फळबाग लागवडीचे १५ हजार लाभार्थी

**रत्नागिरी :** जिल्ह्यात फळबाग लागवडीचे १० हजार हेक्टरचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्यादृष्टीने प्रशासनाने भक्कम पावले टाकली आहेत. यासाठी आतापर्यंत पंधरा हजार लाभार्थ्यांची निवड झाली आहे. वीस ते बावीस लाख रोपांची निर्मिती केल्याने यंदा रोपांची कमतरता भासणार नाही. आंबा, काजूंची ही रोप असल्याने भविष्यात ४० वर्षे उत्पन्न मिळवून देणार आहेत. नोंदणीसाठी अतिशय सोपी पद्धत असल्याने जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी याचा फायदा घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रदीप पी. यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले की, गेल्यावर्षी ५ हजार हेक्टर फळबाग लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण केले. तेव्हा रोपांची कमतरता भासली होती. मात्र, यावेळी शासकीय रोप वाटिकांमधून १५ लाख रोपांची निर्मिती केली आहे.

### भातपिकावरील कीड-रोगांचे कृषीतर्फे सर्वेक्षण

**रत्नागिरी :** शेतकऱ्यांनी कीड-रोगांचा भातपिकावर प्रादुर्भाव आढळून आल्यास संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे संपर्क साधावा, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी भाग्यश्री नाईकनवरे यांनी केले. पिवळा खोडकिडा, गादमाशी, लष्करी अळी, तुडतुडे, निळे भुंगेरे, हिस्पा (काटेरी भुंगा) या किडींबरोबरच पानावरील करपा, पर्णकोष करपा व जीवाणूजन्य करपा या रोगांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. चालू खरीप हंगामात त्या मोहिमेला जिल्ह्यात जुलै ते नोव्हेंबर या कालावधीत सुरवात झाली.

# हेलपाटे मारूनही मिळेना सात-बारा

## आटपाडी तालुक्यातील स्थिती

**अभिजीत डाके**

अॅग्रो अजेंडा

सांगली : आमच्या गावचा तलाठी गावात येतच नाही. आम्हाला तालुक्याच्या ठिकाणी जावून तलाठ्याची भेट घ्यावी लागतेय, पण तेथेही भेट होतच नाही. त्यामुळे सातत्याने हेलपाटे मारावे लागत आहेत. तलाठ्याची भेट झाली तर शासकीय सर्व्हर डाउन आहे, असे सांगितले जातेय. त्यामुळे सातबारा उतारा मिळत नाही. मग नेट कॅफेमधून सातबारा उताऱ्याची प्रिंट काढावी लागते आहे. प्रिंट काढल्यानंतर पुन्हा तलाठ्याची शोधाशोध सुरू होतेय. तलाठी भेटल्यानंतर 'अण्णासाहेब सातबारावर सही शिक्का द्या हो', अशी विनवणी करावी लागतेय, तरीदेखील सही शिक्का मिळत नाही. आम्ही करायचं काय असा प्रश्न आटपाडी तालुक्यातील शेतकरी उपस्थित करत आहेत.

आटपाटी तालुक्यात सुमारे ६० गावे आहेत. करगणी, आटपाडी, खरसुंडी, दिघंजी असे चार सज्जे आहेत. सर्वच तलाठी तालुक्याच्या ठिकाणीच भेटत असल्यामुळे शेतकऱ्यांना लागणारा फेरफार, सातबारा मिळविण्यासाठी तेथे जावे लागते. पण तलाठी भेटतच नाहीत. जिल्ह्यात सातबारा ऑनलाइचे काम शंभर टक्के झाले आहे. मात्र, सर्व्हर सुरू होत नसल्याचे ऑनलाइन सातबारा शेतकऱ्यांना मिळत नाही. त्यामुळे पीककर्ज कसे घ्यायचे, असा प्रश्न शेतकरी उपस्थित करू लागले आहेत. मुळात पीककर्ज घेताना पीक पाहणीत पिकाची नोंद पाहिजे. मात्र, पिकाची नोंद सप्टेंबरनंतर केली जाते. यामुळे पीकपाहणीत जुन्याच पिकाच्या नोंद असलेला सातबारा उपलब्ध होतोय.

शासनाने कर्जमाफी केली आहे. जे शेतकरी नियमित कर्जाची परतफेड करतात. अशा शेतकऱ्यांना कर्ज मिळाले आहे. पण तालुक्यातील अनेक शेतकरी अजून कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे जुने कर्ज भागविल्याशिवाय नवे कर्ज मिळणार नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे पीककर्ज मिळणे मुश्कील झाले आहे. मात्र, शासकीय सर्व्हर डाउन असल्याने ऑनलाइन सातबारा मिळत नाही. त्यामुळे शेतकरी नेट कॅफेचा आधार घेत आहेत. मात्र, त्याठिकाणी देखील अशीच तांत्रिक अडचण येत आहे. परिमाणी सातबारा मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना शर्थीचे प्रयत्न करावे लागत असल्याचे चित्र आहे. जरी त्यातून सातबारा मिळाला तर पुन्हा त्या सातबारा उताऱ्यावर तलाठ्याची सही आणि शिक्का असल्याशिवाय तो ग्राह्य धरला जात नाही. त्यामुळे शेतकरी पुन्हा तलाठ्याच्या शोधात तालुक्याच्या ठिकाणी जातात. शेतकरी दिवसभर तलाठ्याची शोधाशोध करतात. तलाठी भेटल्यानंतर 'अण्णासाहेब या सातबारावर सही शिक्का द्या', अशी विनवणी करतात.

पण तलाठी उद्या या असे सांगून वेळ मारून नेतात. त्यामुळे आम्ही करायचं काय, असा प्रश्न आटपाडी तालुक्यातील शेतकरी उपस्थित करत आहेत.

# पीकविम्याचा ५९ रुपये परतावा योग्यच

## उपविभागीय कृषी अधिकारी खोत यांचा खुलासा; त्रुटी नसल्याची दिली माहिती

**सांगली (प्रतिनिधी) :** प्रधानमंत्री पीकविमा योजनेअंतर्गत पीकविमानिहाय शेतकऱ्यांच्या सहभागानुसार देण्यात येतो. विमा संरक्षण देत असताना सरासरी पाच वर्षांचे उत्पन्न डोळ्यांसमोर ठेवून दिला जातो. रावळगुंडवाडी (ता. जत) 'पीकविमा हप्ता तीन हजार अन् भरपाई मिळाली ५९ रुपये' अशा बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर कृषी विभागाने सर्व स्तरावर चौकशी केली. त्यामध्ये कोणत्याची त्रुटी नाहीत. शेतकऱ्यांना मिळालेली नुकसानभरपाई योग्य असल्याचा खुलासा उपविभागीय कृषी अधिकारी के. बी. खोत यांनी केला आहे.

के. बी. खोत म्हणाले की, जत तालुक्यातील रावळगुंडवाडी येथील खरीप हंगामातील पीकविम्याबाबत दैनिक अॅग्रोवनमध्ये 'पीकविमा हप्ता तीन हजार अन् भरपाई मिळाली ५९ रुपये', अशी बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर कृषी विभागाने शेतकऱ्यांनी भरलेला विम्याची माहिती बँक आणि संबंधित विमा कंपनीकडून मागविण्यात आली. या माहितीची तपासणी केली. रावळगुंडवाडी हे गाव मुचंडी महसुलात येते. पीकविम्याचे संरक्षण देत असताना त्या मंडलातील सरासरी पाच वर्षांच्या उत्पन्नाचा आधार घेतला जातो. म्हणजे सरासरी उत्पन्न किती कमी झाले आहे. याची तपासणी केली जाते. त्याप्रमाणात नुकसानभरपाई मंजूर होते. दरम्यान, यामध्ये कोणत्याही त्रुटी नाहीत. पीकविमा दाव्याप्रमाणे सहभागी कर्जदार, बिगर कर्जदार शेतकऱ्यांना विमा संरक्षण लाभनिश्चिती आणि लाभधारकांना प्रत्यक्ष विमा रक्कम अदायदी योजनेच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येते.

आप्पाराया हिरगोंड आणि महादेव गडीकर या शेतकऱ्यांनी पीकविमा भरला आहे. पीकविमाच्या नियमानुसार त्यांना योग्य पीकविमा दिला आहे. यामध्ये कोणतीही त्रुटी नसल्याचे उपविभागीय कृषी अधिकारी के. बी. खोत यांनी स्पष्ट केले.

# वीज दरवाढ प्रस्तावाची आज कोल्हापुरात होळी

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** महावितरणने २२ टक्के वीज दरवाढीचा प्रस्ताव दिला आहे. यात घरगुती, औद्योगिक तसेच शेतीपंपाच्या ग्राहकांचा खर्चाचा भुर्दंड वाढणार आहे. त्यामुळे दरवाढीला विरोध करण्यासाठी सोमवारी (ता. ३०) प्रस्तावित दरवाढीच्या परिपत्रकाची होळी करण्यात येणार आहे. जिल्हाभरात आंदोलनांची व्याप्ती वाढवली जाणार आहे, अशी माहिती आमदार सतेज पाटील यांनी दिली. ताराबाई पार्कातील महावितरणच्या फाटकासमोर आंदोलन होणार असून ज्येष्ठ नेते प्रा. डॉ. एन. डी. पाटील वीज बिल अभ्यासक प्रताप होगाडे, आमदार सतेज पाटील, महापौर शोभा बोंद्रे आदींच्या उपस्थितीत आंदोलन होणार आहे.

सकाळ अॅग्रोवन — आयोजित

महाधन नजर ठेवा उद्यावर — प्रायोजित

अॅग्रोवन संवाद

'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

**मंगळवार, ३१ जुलै २०१८**

**विषय - एकरी १०० टन ऊस उत्पादन तंत्रज्ञान**

**वक्ते - श्री. विश्वनाथ पाटील**

**(प्रगतीशील शेतकरी, अंबप)**

**स्थळ - विठ्ठलाई मंदिर, मु.पो. खेबवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर**

**वेळ - सायं. ६.३० वा.**

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

# कोल्हापूर जिल्ह्यातील पिकांना पुराचा फटका

## पाच हजार हेक्टरवर नुकसान झाल्याचा अंदाज; वाफसानंतर कळणार नेमकी स्थिती

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** गेल्या पंधरवड्यात झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील नदीकाठावरील सुमारे वीस हजार हेक्टर क्षेत्रावरील पिके पाण्याखाली गेली होती. पाणी चार ते पाच दिवस शिवारात राहिल्याने विशेष करून नदीकाठानजीक असणाऱ्या नुकताच लागवड झालेला ऊस, भात, सोयाबीनचे मोठे नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. अद्याप नेमके किती नुकसान झाल आहे,. याचा आकडा

सामोरा आला नसला तरी किमान पाच हजार हेक्टरवरील विविध पिकांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. विशेष करून लहान उसाचे सर्वाधिक नुकसान झाल्याने आता या शेतकऱ्यांना पुनर्लागवड करावे लागण्याची शक्यता आहे.

### ऊस, भातपिकाचे मोठे नुकसान

दरम्यान, गगनबावडा येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे ऊस, भातपिकाचे मोठे नुकसान झाले. तालुक्यातील नुकसानीचे पंचनामे करावेत व ओला दुष्काळ जाहीर करून भरपाई द्यावी. शेतकऱ्यांची कृषी पंपांचे बिल माफ करावे, अशी मागणी गगनबावडा तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन शेतकऱ्यांच्या वतीने नुकतेच तहसीलदार रावसाहेब चाटे यांना देण्यात आले आहे.

जिल्ह्यात सव्वा लाख हेक्टर क्षेत्रावर ऊस, एक लाख हेक्टर क्षेत्रावर भात, तर साठ हजार हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनचे पीक आहे. जिल्ह्याच्या पश्चिम भागात पुराचा मोठा फटका बसला आहे. एक ते दीड हजार हेक्टरवरील भातालाही याचा फटका बसल्याचा अंदाज आहे.

गगनबावडा, राधानगरी, करवीर, पन्हाळा तालुक्यातील अनेक गावांना पुराचा फटका बसला. पंचगंगा, वारणा, दूधगंगा, भोगावती, हिरण्यकेशी आदी नद्यांचे पाणी पात्राबाहेर पडल्यानंतर तीन ते चार दिवस शिवारात थांबून राहिले. यामुळे कोवळ्या खरीप पिकांचे नुकसान जादा झाल्याची भीती आहे. धरणांतून पाणी सोडण्यात येत असल्याने पाणी ओसरण्याची गती धीमी राहिली. यामुळे अधिक नुकसान झाले.